# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 01/03/2021 (सोमवार)

(दुपार)

---

### पोलीस स्टेशन खापरखेडा नागपूर (ग्रामीण), ची जुगार अडयावर धाड

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत भानेगाव शिवार येथे दिनांक 28/02/2021 चे 17.00 ते 18.00 वा. दरम्यान खापरखेडा पोलीसांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम वरील नमुद घटनास्थळी मोठया प्रमाणात तासपत्यावर पैशांची बाजी लावून जुगार अड्डा चालवुन खेळ खेळत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन खापरखेडा पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून छापा घातला असता आरोपी नामे क्र. 01) मंगेश भोजराज मस्कर वय 37 वर्षे रा भानेगाव 02) भूमेश्वर नत्थू मेश्राम, वय 40 वर्षे, रा भानेगाव, 03) आशिष राजू सोनटक्के, वय 28 वर्षे रा भानेगाव, 04) आकाश राजू बर्वे, वय 18 वर्षे, रा भानेगाव, 05) मुकेश रूपरावजी सिंदूरकर, वय 32 वर्षे, रा बिनाजोड व 06) प्रविण दत्तुजी चिकनकर, वय 42 वर्षे, रा. भानेगाव वरील सर्व आरोपी हे तासपत्त्यावर पैशांची बाजी लावून पैशांचा हारजितचा प्रत्यक्ष जुगार खेळतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन 52 तासपत्ते, नगदी 1,800/– रू., व 06 दुचाकी वाहने किंमती 1,55,000/–रू. असा एकुण 1,56,800/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेले आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक आशिष भुरे, पो.स्टे. खापरखेडा यांचे रिर्पोट वरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम 12 महाराष्ट्र जुगार कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा उमेश ठाकरे 9822764999 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला नागपुर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर ना. ग्रा., उपविभागीय अधिकारी कन्हान विभाग मुख्तार बागवान यांचे मार्गदर्शनात ठाणेदार खापरखेडा पोलीस निरीक्षक श्री पुंडलिक भटकर, पोलिस निरीक्षक श्री चंद्रकान्त काळे, पोहवा उमेश ठाकरे, नापोशि प्रमोद भोयर, आशिष भुरे, पोशि नुमान शेख, राजु भोयर, अश्वीन गजभिये व उपविभागीय कार्यालय कन्हानचे पोउपनि राजु कपाटे व पोहवा सुनिल फाये यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर